Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

"एक पेड,
माँ के नाम..."






'आशा की राह,
कॅन्सर से बचाव...'

ROTARY CLUB OF AMBAJOGAI CITY
25
SILVER JUBILEE
2001-2025

# रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी

# सहयोग

ऑगस्ट २०२५

## कार्य अहवाल

०१ ऑगस्ट २०२५ - ३१ ऑगस्ट २०२५



**रो.रोहिणी पाठक**
अध्यक्ष २०२५-२६



**रो.मंजुषा जोशी**
सचिव २०२५-२६

सहयोग संपादक / डायरेक्टर पब्लिक इमेज
रो.अविनाश मुडेगांवकर

Rotary Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# अनुक्रमाणिका


| अ.क्र. | तारीख | उपक्रमाचे नांव | पा.क्र. |
|---|---|---|---|
| ०१. | ०४/०८/२०२५ | विकली मिटिंग – ५ | ०३ |
| ०२. | ०५/०८/२०२५ | स्तनपान जनजागृती व स्तनदा माता बालकांचे आरोग्य एकदिवसीय मार्गदर्शन शिबिर | ०३ |
| ०३. | ०८/०८/२०२५ | विकली मिटिंग – ०६ (अभिनंदन व कौतुक सोहळा) | ०३ |
| ०४. | १०/०८/२०२५ | वैकुंठ मार्ग हरितमय करीत रोटरीने दिला पर्यावरण संदेश | ०४ |
| ०५. | १०/०८/२०२५ | बोरूळ तलावाजवळील स्मशानभूमी | ०४ |
| ०६. | १०/०८/२०२५ | मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया | ०५ |
| ०७. | ११-१५/०८/२०२५ | २३५ जणांना मिळाली नवी दृष्टी | ०५ |
| ०८. | १६/०८/२०२५ | विकली मिटिंग – ७ | ०५ |
| ०९. | १३-१४/०८/२०२५ | जी.व्ही.टी. कृषिकुल भेट | ०६ |
| १०. | १७/०८/२०२५ | मेम्ब्रिक्स सेमिनार मध्ये रोटरी क्लबचा सहभाग | ०६ |
| ११. | /०८/२०२५ | व्हिजिट ऑफ रोटरी नगर मिडटाऊन फॉर टी.आर.एफ. सेमिनार | ०६ |
| १२. | १६/०८/२०२५ | रोटरी आशा एक्स्प्रेस : कर्करोग निदान शिबिर – ८४ महिलांची तपासणी | ०७ |
| १३. | २३-२५/०८/२०२५ | हाईलाईट्स ऑफ लीड २५ ॲट चेन्नई | ०८ |
| १४. | /०८/२०२५ | बर्थडे विशेश | ०९ |
| १५. | /०८/२०२५ | फ्लायर्स आणि बातम्या | १० |




# Rotary Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

## विकली मिटिंग - ५...




विकली मिटिंग मध्ये डॉ. नवनाथ घुगे यांनी मोफत बालहृदय तपासणी शिबीराचा सादर केला. राजेंद्र घोडके यांनी ६०० रोपांची (वृक्षाची) लागवड करण्याचा प्रस्ताव मांडला व सर्व सभासदांनी त्यास संमती दिली. मेंबरशीप डेव्हलपमेंट सेमिनार बद्दलची माहिती अध्यक्षा रोहिणी पाठक यांनी दिली.

## स्तनपान जनजागृती व स्तनदा माता बालकांचे आरोग्य एकदिवसीय मार्गदर्शन शिबिर...










रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने एकदिवसीय स्तनपान जनजागृती व स्तनदा माताबालकांचे आरोग्य यावर मार्गदर्शन शिबीर, स्त्री रुग्णालय लोखंडी सावरगांव, अंबाजोगाई येथे घेण्यात आले. याप्रसंगी मुख्य मार्गदर्शक म्हणून आहारतज्ज्ञ डॉ.स्वाती शिंदे, स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ.चेतन आदमाने तसेच अधीक्षक स्त्री रुग्णालय डॉ.चंद्रकांत चव्हाण यांची उपस्थिती होती. या शिबिरात १०० हुन अधिक गरोदर तसेच स्तनदा माता यांचा सहभाग होता. हा उपक्रम कम्युनिटी डेव्हलोपमेंट अंतर्गत स्तनदा माता व बालकांचे आरोग्य या अव्हेन्यू मध्ये घेण्यात आला.



सोलापूर

तरुण भारत

# आईच्या दुधाने बाळाचा बौद्धिक विकास होतो–डॉ.स्वाती शिंदे

**रोटरी क्लबच्या वतीने स्तनपान सप्ताह साजरा**

**तभा वृत्तसेवा**

**अंबाजोगाई दि.८ ऑगस्ट**

आईच्या दुधाने बाळाचा बौद्धिक विकास तर होतोच. पण त्याचबरोबर त्याची प्रतिकारशक्ती देखील वाढते. आणि म्हणूनच या मातेच्या दुधाला पहिली लस असे देखील संबोधले जाते. असे प्रतिपादन येथील प्रसिद्ध आहार तज्ज्ञ डॉ.स्वाती अतुल शिंदे यांनी केले.



समर्थ राजयोग

मुख्य संपादक - वैभव स्वामी | मो.9822628521

# आईच्या दुधाने बाळाचा बौद्धिक विकास होतो - डॉ. स्वाती शिंदे

रोटरी क्लबच्या वतीने स्तनपान सप्ताह साजरा

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

आईच्या दुधाने बाळाचा बौद्धिक विकास तर होतोच. पण त्याचबरोबर त्याची प्रतिकारशक्ती देखील वाढते. आणि म्हणूनच या मातेच्या दुधाला पहिली लस असे देखील संबोधले जाते. असे प्रतिपादन येथील प्रसिद्ध आहार तज्ज्ञ डॉ.स्वाती अतुल शिंदे यांनी केले. लोखंडी सावरगाव येथील स्त्रीरुग्णालयात रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीनेस्तनपान जनजागृती व स्तनदा माता बालकांचे आरोग्य या एकदिवसीय मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ.स्वाती शिंदे बोलत होत्या. यावेळी मंचावर स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. चंद्रकांत चव्हाण,डॉ.चंद्रकांत चव्हाण, मार्गदर्शक स्त्रीरोग तज्ज्ञ डॉ. चेतन आदमाने,रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी,सचिव मंजुषा जोशी , स्वरूपा कुलकर्णी, डॉ.अलका तडकलकर , गीता कुलकर्णी , योग शिक्षिका मंदाकिनी गीते यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलताना स्वाती शिंदे म्हणाल्या की बाळ जन्माला आल्यानंतर त्याला काही वेळानंतर पहिल्यांदा आईचेच दुधपाजले पाहिजे. कारण तेच त्याच्या आरोग्यासाठी अत्यंत आवश्यक असते. परंतु, आजकालच्या महिला त्या विसरत चालल्या आहेत की काय? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला.

या प्रसंगी बोलताना डॉ. चंद्रकांत चव्हाण म्हणाले की नवजात बाळांचे आरोग्य आणि मातांचे पोषण यांचा गाभा असलेले स्तनपान हे केवळ एक नैसर्गिक प्रक्रिया नसून, नव्या पिढीचे आरोग्यदायी भविष्य घडवणारे शक्तिशाली माध्यम आहे.स्तनपानाबाबत अजूनही समाजात काही गैरसमज, माहितीअभावी चुका आणि अज्ञान आहेत. हे दूर करताना डॉक्टरांचे मार्गदर्शन आणि सामाजिक संस्थांची भूमिका अत्यंत मोलाची ठरते. म्हणूनच, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आणि स्त्री रुग्णालय लोखंडी सावरगाव यांच्या संयुक्त विद्यमाने. हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी प्रा.रोहिणी पाठक यांनी महिलांना प्रश्नोत्तरातून आईच्या दुधाची बँक या उपक्रमा बाबत जनजागृती केली.यावेळी डॉ.चेतन आदमाने यांनीही स्तनदा मातांना मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रकल्प प्रमुख स्वरुपा कुलकर्णी यांनी केले. संचलन सीमा पार्डीकर. यांनी तर उपस्थितांचे आभार सचिव मंजुषा जोशी यांनी मानले. या कार्यक्रमास रुग्णालयातील परिचारिका व कर्मचारी उपस्थित होते.

## विकली मिटिंग - ०६ (अभिनंदन व कौतुक सोहळा)







संपूर्ण डिस्ट्रिक्ट मधून रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचा प्रथम क्रमांक आला तसेच विविध अव्हेन्यू मध्ये विशेष पारितोषिके मिळवली त्यानिमित्त मागील वर्षाचे अध्यक्ष कल्याण काळे, सचिव धनराज सोळंकी तसेच सर्व पदाधिकारी यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

## वैकुंठ मार्ग हरितमय करीत रोटरीने दिला पर्यावरण संदेश...



रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीचे सक्रिय डायरेक्टर राजेंद्र घोडके तसेच गोरख बापू मुंडे यांच्या सहकार्याने अंबाजोगाई व नजीकच्या परिसरातील ६ स्मशानभूमींना वृक्ष लागवड करून हरितमय केले. या प्रकल्पात नारळ, पिंपळ, अर्जुन, करंज, सीताफळ यांसारख्या सुमारे २००० हुन अधिक वृक्षांची लागवड करण्यात आली. यात बोरूल तलावाजवळील ३ स्मशान भूमी, क्रांती नगर येथील खडकाळ भागातील स्मशानभूमी, सर्वे नं. १७ येथील स्मशानभूमीजवळ असणारे घनवन तसेच जोगाईवाडी येथील २ स्मशानभूमी अशा एकूण ७ स्मशानभूमी व नगर परिषदेनें आखून दिलेल्या मोकळ्या जागा या सर्व ठिकाणी रो.राजेंद्र घोडके यांच्या पुढाकारातून वृक्षारोपण झाले.

## बोरूळ तलावाजवळील स्मशानभूमी...







रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी आणि नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमान अंबेजोगाई शहरातील आखून दिलेल्या विविध मोकळ्या जागेत हरितबीड हरित अंबा नगरी या संकल्पने खालील तसेच सारंगभाई पुजारी मित्र मंडळ यांच्या मदतीने बोरुळ तलावाजवळील तीनही स्मशानभूमींचे सुशोभीकरण हे वृक्षारोपणाच्या सहाय्याने केले याप्रसंगी तीनही स्मशानभूमीत मिळून एकूण साडेसहाशे वृक्षारोपण झाले.













**Rotary**
Club of Ambajogai City

**UNITE FOR GOOD**

## मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया...





मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया आनंद ऋषी नेत्रालय यांच्या सौजन्याने 'अंधमुक्त' गाव ही संकल्पना घेऊन ५८ रुग्णांची तपासणी व १० रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी दुसऱ्या दिवशी अहिल्यानगर येथे रवाना करण्यात आले. ही शस्त्रक्रिया अत्यल्प दरात केली जाते. या शस्त्रक्रियेसाठी रुग्णाची वाहन व्यवस्था, राहणे तथा जेवण व्यवस्था, रुग्णासोबत एक व्यक्तीसह ही २५०० रुपयात शस्त्रक्रियेसह निधी घेतला जातो.

## २३५ जणांना मिळाली नवी दृष्टी...







**लोकमत**

### मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**अंबाजोगाई :** वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय व लोखंडी सावरगाव येथील रुग्णालयात १४ ऑगस्टपर्यंत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले असून या शिबिराचा रविवारी १० जणांच्या शस्त्रक्रिया करून प्रारंभ करण्यात आला. दोन्ही रुग्णालयात मोतीबिंदू मोफत शस्त्रक्रिया होणार आहेत. या शस्त्रक्रिया करण्यासाठी दोन्ही रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची टीम दाखल झाली आहे. रविवारी सकाळी वृद्धत्व व मानसिक आजार केंद्राचे अधीक्षक डॉ. सुनील जाधव, स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. चंद्रकांत चव्हाण, कल्याण काळे, रोटरीच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सचिव मंजूषा जोशी, प्रा. अजय पाठक, आनंद जाजू, महादू मस्के, अनंत अरसुडे, डॉ. दिलीप गायकवाड, डॉ. विमला ईदगार आदी उपस्थीत होते.

## "मोतीबिंदू शस्त्रक्रियेनंतर मिळते नवी दृष्टी..."





## विकली मिटिंग - ७



मोफत कर्करोग निदान शिबीर तसेच ग्लोबल विकास ट्रस्ट कृषिकुल येथील मयंक गांधी यांच्या समवेत मिटिंग आणि मेंबरशिप डेव्हलपमेंट सेमिनार अकलूज यावर चर्चा झाली.

Rotary Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

## जी.व्ही.टी. कृषिकुल भेट...







रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या वतीने ग्लोबल विकास ट्रस्ट (जी.व्ही.टी.) कृषिकुल येथे श्री. मयंक गांधी यांच्यासोबत भेट आयोजित करण्यात आली. अंबाजोगाई व परिसरातील ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी संयुक्त प्रकल्प राबविण्याच्या दृष्टीने ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली. अंबाजोगाई तालुक्यात शाश्वत ग्रामीण विकास प्रकल्प राबविण्यासाठी सामाजिक सहकार्य निर्माण करणे. जलसंधारण, प्रगत शेती, सेंद्रिय शेती व शेतकरी सक्षमीकरण या क्षेत्रांत संयुक्त उपक्रम आखणे. रोटरी फाउंडेशन ग्लोबल ग्रँट व सी.एस.आर. माध्यमातून मोठ्या प्रमाणात परिणामकारक प्रकल्प उभारणे.

## मेम्ब्रिक्स सेमिनार मध्ये रोटरी क्लबचा सहभाग...








अकलूज येथे मेंबरशिप डेव्हलपमेंट सेमिनारसाठी मेम्ब्रिक्स सेमिनारमध्ये रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटीच्या मेंबरशिप डेव्हलपमेंट डायरेक्टर सुनंदाताई मुंदडा, अध्यक्षा रोहिणी पाठक आणि सचिव मंजुषा जोशी व अभिषेक मुंदडा यांची उपस्थिती होती.

## व्हिजिट ऑफ रोटरी नगर मिडटाऊन फॉर टी.आर.एफ. सेमिनार...



Rotary Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

## रोटरी आशा एक्स्प्रेस : कर्करोग निदान शिबिर – ८४ महिलांची तपासणी...









आद्यकवी मुकुंदराज सभागृहाच्या प्रांगणात स्व.डॉ.सौ. विमलताई मुंदडा यांच्या जयंती निमित्त रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व विवेकानंद कॅन्सर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, लातूर यांच्या वतीने मोफत कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन आ.नमिता अक्षय मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात ८४ महिलांची स्तन व गर्भाशय कर्करोग तपासणी व २३ पुरुषांची मुख कर्करोग तपासणी झाली. या तपासणीमध्ये ६ महिला व २ पुरुष संशयित आढळून आल्याने त्यांना पुढील उपचारासाठी मार्गदर्शन केले.

### कर्करोग जनजागृतीसाठी महिलांचा पुढाकार महत्वाचा - आ. नमिता मुंदडा

» वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व रोटरी क्लब यांच्या वतीने मोफत कर्करोग निदान शिबिर

अंबाजोगाई –: दिवसेंदिवस कर्करोगाच्या रुग्णांची वाढ होत आहे.ही रोखण्यासाठी कर्करोग जनजागृतीसाठी महिलांचा पुढाकार महत्वाचा आहे.असे प्रतिपादन आ.नमिता मुंदडा यांनी केले.

शनिवारी सकाळी आद्यकवी मुकुंदराज सभागृहाच्या प्रांगणात स्व.डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांच्या जयंती निमित्त वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, विवेकानंद कॅन्सर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, लातूर यांच्या वतीने मोफत कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्‌घाटक म्हणून आ.नमिता मुंदडा बोलत होत्या.

यावेळी मंचावर भाजपाचे नेते अक्षय मुंदडा,



▸ पान 3 वर

प्रजापत्र

17AUG2025

### कर्करोग जनजागृतीसाठी महिलांचा पुढाकार महत्वाचा–आ.मुंदडा

अंबाजोगाई दि.१६ (प्रतिनिधी): दिवसेंदिवस कर्करोगाच्या रुग्णांची वाढ होत आहे.ही रोखण्यासाठी कर्करोग जनजागृतीसाठी महिलांचा पुढाकार महत्वाचा आहे.असे प्रतिपादन आ.नमिता मुंदडा यांनी केले. शनिवारी सकाळी आद्यकवी मुकुंदराज सभागृहाच्या प्रांगणात दिवंगत डॉ. विमल मुंदडा यांच्या



जयंती निमित्त वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, विवेकानंद कॅन्सर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल,

▸▸ पान ५ वर

अंबेजोगाई टाइम्स

रविवार (Date 17 Aug. 2025) (Page No.1)

### कर्करोग जनजागृती साठी महिलांचा पुढाकार महत्वाचा–आ.नमिता मुंदडा

अंबाजोगाई –: दिवसेंदिवस कर्करोगाच्या रुग्णांची वाढ होत आहे.ही रोखण्यासाठी कर्करोग जनजागृतीसाठी महिलांचा पुढाकार महत्वाचा आहे.असे प्रतिपादन आ.नमिता मुंदडा यांनी केले. शनिवार दि.१६ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी आद्यकवी मुकुंदराज सभागृहा च्या प्रांगणात स्व.डॉ. सौ. विमलताई मुंदडा यांच्या जयंती निमित्त वसुंधरा सेवा प्रतिष्ठान, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी, विवेकानंद कॅन्सर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, लातूर यांच्या वतीने मोफत कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या उद्घाटक म्हणून आ.नमिता मुंदडा बोलत होत्या.



यावेळी मंचावर भाजपाचे नेते अक्षय मुंदडा, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. बालासाहेब लोमटे, रोटरी क्लबच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सचिव मंजुषा जोशी, इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा संगीता नावंदर, माजी अध्यक्ष कल्याण काळे, माजी नगराध्यक्ष महादू मस्के, विवेकानंद कॅन्सर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटलचे समन्वयक डॉ. बाजीराव जाधव, डॉ.मिथाली बिराजदार, कपिल वाघमारे, दिपाली कस्तुरे, राजेश्वरी सुराणा, दुर्गा रसाळ,सुखदेव थोरात,यांची उपस्थिती होती. या शिबिरात ८४ जणांची मोफत कर्करोग तपासणी झाली. यावेळी कर्करोग जनजागृती साठी कार्य करणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्या अर्चना स्वामी यांचा सत्कार आ. मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी रोटरी क्लबचे डॉ.सुरेश अरसुडे, प्रा. संतोष मोहिते, डॉ. निशिकांत पाचेगाव कर, प्रवीण चोकडा, स्वप्नील परदेशी, अजित देशमुख, अभिजित मुंदडा,रुपेश रामावत, वसुंधरा सेवा प्रतिष्ठानचे संजय गंभीरे,डॉ.सुधीर धर्मपात्रे, प्रशांत अदनाक,शिरीष मुकडे, शरद इंगळे,अनंत अरसूडे, शशिकांत गायकवाड, मंदार काटे,गौरव लामतुरे,संतोष जिरे,शैलेश स्वामी, महेश अंबाड, राहुल कापसे,मयुर रणखांब, दीपक कोरडे,योगेश कडबाने, अजय राठोड,सचिन केंद्रे, सचिन वाघमारे,अक्षय भुमकर,प्रताप देवकर उपस्थित होते. दर महिन्याला होणार शिबिर : वसुंधरा सेवा प्रतिष्ठाण, रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी व विवेकानंद कॅन्सर न्ड सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल, लातूर संयुक्त विद्यमाने प्रत्येक महिन्यात मतदार संघातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र,उपजिल्हा रुग्णालय, अशा ठिकाणी मोफत कर्करोग निदान शिबिराचे आयोजन करण्यात येणार आहे. असे सांगून अंबाजोगाईत कॅन्सर सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल सुरू करण्यासाठी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा सुरू आहे.

**–आ.नमिता अक्षय मुंदडा,**
केज विधानसभा मतदार संघ

**Rotary**
Club of Ambajogai City

**UNITE FOR GOOD**

## HIGHLIGHTS OF LEAD 25 AT CHENNAI - ROTARY INTERNATIONAL CONVENTION

President Rohini Pathak rolled as Sargent at arms in Chief team with RI President Francisco Arezzo, MMM, K.P.Nagesh, Actor and MP Kamal Hassan and ISRO director Narayanan.
it's a very amazing experience on international Canvas of Rotary and proud moment for Rotary Club.



Rotary
Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD

# BIRTHDAY WISHES



Rotary Club of Ambajogai City

UNITE FOR GOOD






प्रजापत्र

17AUG2025

कर्करोग जनजागृतीसाठी महिलांचा पुढाकार महत्वाचा—आ.मुंदडा









तरुण भारत

आईच्या दुधाने बाळाचा बौद्धिक विकास होतो–डॉ.स्वाती शिंदे





लोकमत

मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरास प्रारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क

**अंबाजोगाई :** वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व रोटरी क्लब ऑफ अंबाजोगाई सिटी यांच्या वतीने स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय व लोखंडी सावरगाव येथील रुग्णालयात १४ ऑगस्टपर्यंत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले असून या शिबिराचा रविवारी १० जणांच्या शस्त्रक्रिया करून प्रारंभ करण्यात आला. दोन्ही रुग्णालयात मोतीबिंदू मोफत शस्त्रक्रिया होणार आहेत. या शस्त्रक्रिया करण्यासाठी दोन्ही रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टरांची टीम दाखल झाली आहे. रविवारी सकाळी वृद्धत्व व मानसिक आजार केंद्राचे अधीक्षक डॉ. सुनील जाधव, स्त्री रुग्णालयाचे अधीक्षक डॉ. चंद्रकांत चव्हाण, कल्याण काळे, रोटरीच्या अध्यक्षा प्रा. रोहिणी पाठक, उपाध्यक्ष धनराज सोळंकी, सचिव मंजूषा जोशी, प्रा. अजय पाठक, आनंद जाजू, महादू मस्के, अनंत अरसुडे, डॉ. दिलीप गायकवाड, डॉ. विमला ईदगार आदी उपस्थीत होते.








अंबाजोगाई टाइम्स

(Date 17 Aug. 2025)

(Page No.1)

कर्करोग जनजागृती साठी महिलांचा पुढाकार महत्वाचा–आ.नमिता मुंदडा


कर्करोग जनजागृतीसाठी महिलांचा पुढाकार महत्वाचा - आ. नमिता मुंदडा

वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व रोटरी क्लब यांच्या वतीने मोफत कर्करोग निदान शिबिर


समर्थ राजयोग

आईच्या दुधाने बाळाचा बौद्धिक विकास होतो - डॉ. स्वाती शिंदे

09 Aug 2025 - Page 6 | www.samarthrajyog.com